लोकसत्ता 13 JUL 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अभियांत्रिकी शाखांचा सीमाविरहित अभ्यास करणे ही काळाची गरज'

प्रतिनिधी, कोल्हापूर

**अभियांत्रिकीच्या क्षेत्रात** आता स्पेशलायझेशनबरोबरच सर्वच अभियांत्रिकी शाखांचा सीमाविरहित आंतरविद्याशाखीय अभ्यास करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन थायलंड येथील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील प्रा. मनुकीड पार्निच्कून यांनी सोमवारी येथे केले.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे प्रायोजित ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर नेटवर्क्स (ग्यान) या उपक्रमांतर्गत आजपासून शिवाजी विद्यापीठात मेकॅट्रॉनिक्सः सिनर्जिक इंटिग्रेशन ऑफ मेकॅनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयावरील कार्यशाळेस प्रारंभ झाला. या उद्‌घाटनप्रसंगी कार्यशाळेचे प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. मनुकीड बोलत होते.. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते. टाटा टेक्नॉलॉजिजचे संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी व इक्विनॉक्स कंपनीचे संस्थापक अध्यक्ष एस. डी. प्रधान यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. या वेळी टाटा टेक्नॉलॉजिजचे माजी उपाध्यक्ष कुमार रामचंद्रन प्रमुख म्हणून उपस्थित होते.

मेकॅट्रॉनिक्स व रोबोटिक्स विषयातील जागतिक दर्जाचे तज्ज्ञ असलेल्या प्रा. मनुकीड यांनी कार्यशाळेतील मार्गदर्शनाविषयी आपली भूमिका विशद केली. ते म्हणाले, आज जगातील कोणत्याही अभियंत्याला अभियांत्रिकीच्या अन्य शाखांचे वावडे असता कामा नये. मेकॅनिकल अभियंत्याने त्याला आवश्यक असलेल्या हार्डवेअरसाठीचा प्रोग्राम स्वतःच तयार केला, तर त्याला हवा तो निकाल मिळू शकतो. यांसारख्या समस्यांवर मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या संगमातून निर्माण झालेल्या मेकॅट्रॉनिक्स या आंतरविद्याशाखेच्या माध्यमातून उपाय शोधता येणे शक्य झाले आहे.

प्रधान यांनी बाऊंड्रीलेस इंजिनिअर या संकल्पनेची जगाला विशेषतः भारताला मोठी गरज असल्याचे सांगितले. अभियांत्रिकीचे भवितव्य बदलांच्या स्वीकारासाठी आपण तयार असले पाहिजे. त्यासाठी शिक्षण व उद्योग क्षेत्रांतील सुसंवाद वाढविण्यावर भर देण्याची गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

कुमार रामचंद्रन यांनीही आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या बळावर गेल्या चारशे वर्षांत झाले नाहीत, इतके गतिमान बदल येत्या तीस ते चाळीस वर्षांत होणे अपेक्षित असल्याचे सांगितले. त्यासाठी अभियांत्रिकी शाखांचा एकात्मिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांनी प्रास्ताविक केले. ग्यान प्रकल्पाविषयी समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळा समन्वयक उदय पाटील यांनी परिचय करून दिला. जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी आभार मानले. या वेळी डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव, विद्याधर कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
महाराष्ट्र टाईम्स 13 JUL 2016

# 'आंतरविद्याशाखीय अभ्यास गरजेचा'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

अभियांत्रिकीच्या क्षेत्रात स्पेशलायझेशनबरोबरच सर्वच अभियांत्रिकी शाखांचा सीमाविरहित आंतरविद्याशाखीय अभ्यास करणे काळाजी गरज आहे, असे प्रतिपादन थायलंड येथील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील प्रा. मनुकीड पार्निचकून यांनी केले. ग्लोबल इनिशिएटीव्ह फॉर अॅकेडेमिक नेटवर्क्स (ग्यान) उपक्रमांतर्गत 'मॅकॅट्रॉनिक्स : सिनर्जिक इंटिग्रेशन ऑफ मॅकेनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फर्मेशन टेक्नॉलॉज' विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.



मॅकॅट्रॉनिक्स कार्यशाळेत बोलताना प्रा. मनुकीड.

**मॅकॅट्रॉनिक्स कार्यशाळा**

प्रा. मनुकीड म्हणाले, 'जगातील कोणत्याही अभियंत्याला अभियांत्रिकीच्या अन्य शाखांचे वावडे असता कामा नये. मॅकेनिकल अभियंत्याने त्याला आवश्यक असलेल्या हार्डवेअरसाठीचा प्रोग्राम स्वत:च तयार केला,तर त्याला हवा तो निकाल मिळू शकतो. मॅकेनिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या संगमातून निर्माण झालेल्या मॅकेट्रॉनिक्स या आंतरविद्याशाखेच्या माध्यमातून उपाय शोधता येणे शक्य झाले आहे.'

टाटा टेक्नॉलॉजीचे संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी व इक्विनॉक्स कंपनीचे संस्थापक अध्यक्ष एस. डी. प्रधान म्हणाले, 'बाउंड्रीलेस इंजिनीअर संकल्पनेची जगाला विशेषत: भारताला मोठी गरज असून आतापर्यंत अभियांत्रिकीने वाफ, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, आयटी व बायोटेक्नॉलॉजी असा व्यापक प्रवास केला आहे. ए. आय संकल्पनेमुळे पुर्वीच्या अनेक मुलभूत संकल्पनांकडे नव्या दृष्टीने 'अभ्यासण्याची गरज निर्माण झाली आहे.' प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

. यावेळी डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव, 'ग्यान' चे समन्वयक डॉ. आर. के. कामत, उदय पाटील, विद्याधर कांबळे याच्यासह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. डॉ. जे. एस. बागी यांनी प्रास्ताविक केले.

लोकसत्ता 13 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात पाणवठे 'ओव्हर फ्लो'

प्रतिनिधी, कोल्हापूर

**गेल्या चार** दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे येथील शिवाजी विद्यापीठ परिसरातील सर्व पाणवठे आज 'ओव्हर फ्लो' झाले. विद्यापीठ परिसरामध्ये ३० कोटी लीटर साठा झाला आहे. विशेष म्हणजे सन २००५ नंतर कधीही न भरलेला वि. स. खांडेकर भाषा भवनामागील तलाव चार दिवसांतच शंभर टक्के भरून वाहू लागला आहे. त्याचप्रमाणे दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हाती घेतलेल्या शेततळे विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेली तीन शेततळीही दोन दिवसांतच पूर्ण क्षमतेने भरली आहेत.

शिवाजी विद्यापीठात भाषा भवनामागील तलावाबरोबरच संगीत अधिविभागामागील तलाव, नूतन तीन शेततळी आणि पाच विहिरी असे एकूण दहा पाणवठे आहेत. संगीत अधिविभागाशेजारील तलाव काल सायंकाळीच पूर्णक्षमतेने भरल्याचे दिसून आले. पुलाच्या दोन्ही बाजूला तलाव पाण्याने तुडुंब भरल्याचे दृश्य खूप दिवसांनंतर पाहता आले. भाषा भवनामागील तलावही जवळजवळ दहा वर्षांनंतर पहिल्याच पावसात शंभर टक्के भरला आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर, यंदा विद्यापीठाने शेततळी विकास कार्यक्रम हाती घेतला होता. या अंतर्गत तीन शेततळी विकसित करण्यात आली होती. ही तीनही शेततळी पूर्णक्षमतेने भरली आहेत. याबरोबरच विद्यापीठ परिसरातील सुतार विहीर, क्रीडा अधिविभागाशेजारील विहीर आणि रसायनशास्त्र अधिविभागाशेजारील विहीर या तिन्ही पूर्ण भरल्या आहेत. याखेरीज विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकच्या मागील बाजूची आणि सुतार विहिरीशेजारील शिंदे विहीर या दोन विहिरींमधील गाळ काढून यंदा पुनरुज्जीवन करण्यात आले. या दोन्ही विहिरीसुद्धा भरून ओसंडून वाहू लागल्या आहेत. विद्यापीठातील विविध पाणवठ्यांची क्षमता पुढीलप्रमाणे- भाषा भवन तलाव- २२ कोटी १५ लाख लीटर, संगीत अधिविभाग तलाव- ५ कोटी २० लाख लीटर, सुतार विहीर-४ लाख लीटर, क्रीडा अधिविभाग विहीर- ४.८७ लाख लीटर, रसायनशास्त्र अधिविभाग विहीर- ३ लाख लीटर, सिंथेटिक ट्रॅकशेजारील विहीर- ५ लाख लीटर, शिंदे विहीर- ३ लाख लीटर, तीन नूतन शेततळी- ३५ लाख लीटर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स 13 JUL 2016



शिवाजी विद्यापीठातील भाषा भवन येथील तलाव पूर्ण क्षमतेने भरला आहे.

# विद्यापीठातील तलाव झाले ओव्हर-फ्लो

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

गेल्या चार दिवसांपासून कोल्हापूर परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे येथील शिवाजी विद्यापीठ परिसरातील सर्व पाणवठे आज 'ओव्हर-फ्लो' झाले. विशेष म्हणजे सन २००५ नंतर कधीही न भरलेला वि. स. खांडेकर भाषा भवनामागील तलाव चार दिवसांतच शंभर टक्के भरून वाहू लागला आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने हाती घेतलेल्या शेततळे विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेली तीन शेततळीही दोन दिवसांतच पूर्ण क्षमतेने भरली.

शिवाजी विद्यापीठात भाषा भवनामागील तलावाबरोबरच संगीत अधिविभागामागील तलाव, नवी तीन शेततळी आणि पाच विहिरी असे एकूण दहा पाणवठे आहेत. संगीत विभागाशेजारील तलाव काल सायंकाळीच पूर्ण क्षमतेने भरला. भाषा भवनमागील तलावही दहा वर्षांनंतर शंभर टक्के भरला आहे. यंदा विद्यापीठाने शेततळी विकास कार्यक्रम हाती घेतला होता. तीन शेततळी विकसित करण्यात आली होती. ही तीनही शेततळी पूर्ण क्षमतेने भरली आहेत. याबरोबरच विद्यापीठ परिसरातील तीन विहिरीबरोबरच पुनरुज्जीव केलेल्या विहिरीही तुडूंब भरल्या आहेत.

'कुलगुरू डॉ. शिंदे' यांच्या मार्गदर्शनाखाली राबवलेल्या जलयुक्त विकास कार्यक्रमाचे फलित असल्याचे बीसीयूडी डायरेक्टर डॉ. डी. आर. मोरे यांनी सांगितले.

सकाळ 13 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्यासाठी विद्यापीठ स्वयंपूर्ण

## सात चरींचे पुनरुज्जीवन : २००५ नंतर भरला भाषा भवनजवळील तलाव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवले, तर एखादी मोठी संस्थाही कशी पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकते, याचा आदर्श शिवाजी विद्यापीठाने घालून दिला आहे. गेल्या वर्षी पाण्यासाठी महापालिकेवर अवलंबून असलेल्या विद्यापीठाला यंदा स्वत:च्या परिसरातच मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.

भाषा भवनाजवळच्या तलावात जवळपास २२ कोटी लिटर पाणी यात साचते. २००५ मध्ये झालेल्या जोरदार पावसात हा तलाव भरला होता. त्यानंतर पुन्हा एकदाही हा तलाव भरलेला नाही. याबाबत प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी याकडे विशेष लक्ष दिले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याशी चर्चा करून त्यांनी काही प्रयोग राबविले. रसायनशास्त्र विभागाकडून नवीन चर खोदली. एनएसएस विद्यार्थ्यांच्या मदतीने नवीन चर खोदून तलावात पाणी येईल, अशी व्यवस्था केली. यापूर्वी पावसाचे पाणी या तलावात येत नव्हते. वरच्या बाजूला थांबून ते वाहून जायचे. तेच पाणी चर खोदून या तलावात आणले. त्यामुळे केवळ चार दिवसांतच २२ कोटी लिटर क्षमतेचा तलाव आज भरला. तलावाचे क्षण टिपण्यासाठी डॉ. शिंदे उशिरापर्यंत तलाव परिसरात थांबून होते.

'सकाळ'शी बोलताना डॉ. शिंदे म्हणाले, "राबविलेल्या विकास कार्यक्रमाला यंदा पावसाने साथ दिली आहे. परिसरातील पाणी तलावांकडे वाहून नेण्यासाठी भाषा भवनच्या मागील बाजूस सात चरींचे पुनरुज्जीवन केले. रसायनशास्त्र विभागाच्या मागील बाजूस नवीन चर तयार करण्यात येऊन तेथूनही तलावाकडे पाणी वळविले."



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भाषा भवनाशेजारील तलाव ११ वर्षांनंतर पहिल्यांदाच पहिल्या पावसात ओव्हरफ्लो झाला.**

### पिण्यासाठी होणार वापर

**साठ्यामुळे पिण्याची पाण्याची गरज भासणार आहे. या शिवाय दैनंदिन गरजेचे पाणीही उपलब्ध होणार आहे. गेल्या वर्षी पालिकेचे पाणी वापरावे लागले. लवकरच पालिकेचे पाणी बंद केले जाईल, असेही डॉ. शिंदे यांनी सांगितले.**

**पाणवठ्यांची क्षमता अशी :**

- भाषा भवन तलाव - २२ कोटी १५ लाख लिटर
- संगीत अधिविभाग तलाव - ५ कोटी २० लाख लिटर
- सुतार विहीर - ४ लाख लिटर
- क्रीडा अधिविभाग विहीर - ४.८७ लाख लिटर
- रसायनशास्त्र अधिविभाग विहीर - ३ लाख लिटर
- सिंथेटिक ट्रॅकशेजारील विहीर - ५ लाख लिटर
- शिंदे विहीर - ३ लाख लिटर
- तीन नूतन शेततळी - एकूण ३५ लाख लिटर (२५+५+५)

---

पुढारी 13 JUL 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील पाणवठे 'ओव्हरफ्लो'

## यंदा पहिल्यांदाच पाणवठे तुडुंब; विद्यापीठाचा परिसर बनला पाणीदार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

धुवाँधार पावसामुळे शिवाजी विद्यापीठ परिसरातील सर्व पाणवठे, शेततळी व विहिरी तुडुंब भरून वाहू लागल्या आहेत. २००५ नंतर आजतागायत कधीही पूर्ण न भरलेला वि. स. खांडेकर भाषा भवनामागील तलाव शंभर टक्के भरला आहे. हा परिसर पाणीदार बनला आहे.

शिवाजी विद्यापीठात पाणीसाठवण तलाव आहेत. तसेच तीन शेततळी यंदा निर्माण करण्यात आली होती. मागील चार दिवस सर्वत्रच अतिवृष्टी सुरू आहे. या जोरदार पावसाचा परिणाम विद्यापीठातील पाणवठे तुडुंब भरले आहेत. विद्यापीठातील पाणीसाठे पूर्ण भरले असल्याने प्रशासनाकडून समाधान व्यक्त करण्यात आले. कारण विद्यापीठ जलस्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

याबाबत प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, विद्यापीठाने जलयुक्त परिसर या संकल्पनेतून चांगले काम केल्याचा हा परिणाम आहे.



**शिवाजी विद्यापीठात तुडुंब भरून वाहत असलेल्या तलावाचे दृश्य.**

- **तलावांची नावे व पाणीक्षमता**
- भाषा भवन तलाव (२२ कोटी १५ लाख लिटर)
- संगीत अधिविभाग तलाव (५ कोटी २० लाख लिटर)
- सुतार विहीर (४ लाख लिटर)
- क्रीडा अधिविभाग विहीर (४.८७ लाख लिटर)
- रसायनशास्त्र अधिविभाग विहीर (३ लाख लिटर)
- सिंथेटीक ट्रॅकशेजारील विहीर (५ लाख लिटर)
- शिंदे विहीर (३ लाख)
- तीन शेततळी (एकूण - ३५ लाख लिटर)